मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया

(मराठी)

अंक ०४ • वर्ष २० वे • पृष्ठे ५२ • एप्रिल - २०२३



# हसती दुनिया
(मराठी)

अंक ०४ • वर्ष २० वे • पृष्ठे ५२ • एप्रिल - २०२३

**बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट**

**(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)**

संपादक
**राजेंद्र थोरात**
(अवैतनिक)

सजावट व चित्रे
**स्वप्निल वि. ऱ्हाटवळ**
**राजनंदन कृ. पिंपळकर • श्रीकांत द. पाटील**

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका संतोष प्रिंटर्स, जय शिवाजी नगर, कात्रक रोड, बेस्ट डेपो, वडाळा, मुंबई- ४०००३१, येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
E-mail : marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही

| देश | 1 वर्ष | 3 वर्ष | 5 वर्ष | 11 वर्ष |
|---|---|---|---|---|
| भारत/नेपाळ | ₹ 150 | ₹ 400 | ₹ 700 | ₹ 1500 |
| यू.के. | £ 15 | £ 40 | £ 70 | £ 150 |
| यूरोप | € 20 | € 55 | € 95 | € 200 |
| अमेरिका | $ 25 | $ 70 | $ 120 | $ 250 |
| कॅनडा/ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 85 | $ 140 | $ 300 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९







## स्तंभ


- दोन शब्द ०४
- विचारपुष्प १०
- दादाला विचारु या १३
- शब्दकोडे १४
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे १५
- दिव्यवाणी २५
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- हसा मुलांनो हसा ३०
- आरोग्याचा मंत्र ३५
- सामान्य ज्ञान ४७
- चित्र काढा आणि रंग भरा ५०


## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३८





## विशेष व प्रेरक प्रसंग


- व्यक्तिविशेष ०७
- विशेष - पुरस्कार २३
- दिनविशेष २४
- भ्रमंती २८
- स्वामी विवेकानंद : प्रेरक प्रसंग ३४
- संतकथा ४२
- मत्स्यपुराण ४८
- विश्वजगत ४९








## कथा


- भगवान परशुराम ०५
- मैत्री म्हणजे त्याग ०८
- कर्मानुसार गती २०
- मानवतेचं लक्षण २१
- चूक उमगली ३२
- सत्कर्मासाठी एक पाऊल ४४
- जे होतं ते चांगल्यासाठी ४५








## कविता


- पुस्तकरुपी अनमोल देण १२
- एक परिवार ४३

# पक्षी वाचवा मोहीम

एसएससीची परीक्षा संपली म्हणून राजू आपल्या मामाच्या गावी गेला. मामाचं गाव निसर्गाच्या कुशीत वसलेलं. अंगणातच आंब्याचा डेरेदार वृक्ष. त्यावर किलबिलाट करणारी पाखरं. राजूला असं खूप आवडत असे; परंतु हे काय?.... आज नेहमीसारखा पक्ष्यांचा कलकलाट नाही. अंगणात चिवचिवाट करणाऱ्या चिमण्याही गायब! त्याने मामांना या बाबत प्रश्न विचारला. मामा म्हणाले, बाळ! अलीकडे वातावरण प्रदूषित होत चाललंय. मोबाईल टॉवर्स उभारले जात आहेत. उन्हाचा तडाखा वाढत चालला आहे. पाणवठे सुकत आहेत. त्यामुळे पक्ष्यांचं जीवन धोक्यात आलंय.

राजूने निश्चय केला, आता ही परिस्थिती बदलायलाच हवी. अचानक त्याला एक कल्पना सुचली. त्याने अडगळीत टाकलेले काही टीनचे डबे, प्लास्टिकचे कॅन, पुठ्ठ्याचे खोके जमा केले. त्यांना चारही बाजूने गोलकार छिद्रं पाडली. प्रत्येकामध्ये एक एक पाण्याने भरलेली वाटी आणि धान्याची वाटी ठेवली. पिंजऱ्यासारखे ते झाडाच्या फांद्यांना अडकवले. दोन–तीन दिवसांनी चमत्कार झाला. पाखरं हळूहळू झाडाकडे परतू लागली. वाटीतलं पाणी पिऊ लागली. धान्य टिपू लागली. पाहता पाहता पाखरांचा किलबिलाट वाढला. राजूला खूप आनंद झाला. हा प्रयोग आता संपूर्ण गावात करायचा असं त्याने ठरवलं. तो गावात गेला. आपल्या सर्व सवंगड्यांना त्याने ही गोष्ट सांगितली. राजूची ही कल्पना सर्वांना खूपच आवडली. प्रत्येकाने आपापल्या घरुन रिकामे टीनचे डबे, खोके, कॅन गोळा केले. राजूच्या मार्गदर्शनाप्रमाणे पक्ष्यांसाठी निवारे बनवले. हा प्रयोग गावामध्ये सर्व ठिकाणी यशस्वी झाला. गावामध्ये राजूच्या 'पक्षी वाचवा' मोहीमेची चर्चा सुरू झाली. गावातर्फे राजूचा सत्कार करण्याचं ठरलं. राजू म्हणाला, ही तर माझ्या सद्‌गुरुंची कृपा आहे. अलीकडेच मिशनतर्फे आम्ही 'स्वच्छ जल स्वच्छ मन' प्रकल्प राबवला. स्वच्छ पाण्याची गरज जशी माणसाला आहे, तशी ती सर्व जीवांना आहे, पशुपक्ष्यांना आहे आणि दयाभाव स्वच्छ मनामध्येच येऊ शकतो. म्हणून हा प्रयोग मी यशस्वी करू शकलो. माझा सत्कार करण्याऐवजी ही कल्पना सर्वत्र पोचवा, हेच माझ्यासाठी मोठं बक्षीस असेल.

मित्रांनो, आपणही राजूचा आदर्श घेऊ या. तहानलेल्या मुक्या जीवांसाठी वाटीभर पाणी आपल्या गॅलरीत, छतावर किंवा मोकळ्या जागेमध्ये ठेवून त्यांची तहान भागवू या. कारण सगळ्यांना जगण्याचा अधिकार आहे. मग त्यांच्यासाठी एवढं करायला काय हरकत आहे? तेवढीच आपली सुट्टी सार्थकी लागेल, नाही का?

- राजेंद्र थोरात •••



पौराणिक कथासार

# भगवान परशुराम

भगवान विष्णूंचा सहावा अवतार म्हणजे भगवान परशुराम. त्यांचा जन्म अक्षय तृतीयेला झाला. म्हणून अक्षय तृतीयेच्या दिवशी परशुराम जयंती देखील साजरी केली जाते. भगवान परशुराम यांच्या पित्याचे नाव होते जमदग्नी ऋषी आणि मातेचे नाव रेणुकादेवी. त्यांना चार भाऊ होते. जमदग्नी ऋषी खूप मोठे तपस्वी होते. तसेच ते कोपिष्टही होते. एके दिवशी त्यांनी होम हवन करण्यासाठी पत्नी रेणुकादेवीला नदीवर पाणी आणण्यासाठी पाठवले. त्याचवेळी चित्ररथ गंधर्व आणि इतर अप्सरा स्नानासाठी नदीवर आल्या होत्या. रेणुकादेवी चित्ररथ गंधर्वाचे सौंदर्य पाहून थक्क झाल्या. त्या क्षणभर त्याच्याकडे पाहतच राहिल्या. हवनची वेळ निघून गेली तरी रेणुकादेवी पाणी घेऊन परत आल्या नाही. जमदग्नी ऋषींनी अंतर्ज्ञानाने हे जाणले, तेव्हा त्यांना मोठा क्रोध आला. आपल्या पत्नीने परक्या

पुरुषाकडे पाहत राहणे हे महापाप आहे. म्हणून त्यांनी आपल्या चारही पुत्रांना आज्ञा केली, की तुमच्या मातेचा वध करा; परंतु ते धाडस कोणीही करू शकला नाही. ऋषींनी त्यांना अचेतन होऊन पडाल असा शाप दिला. नंतर त्यांनी परशुरामांना आदेश दिला. परशुरामांनी पित्याची आज्ञा मानून कुऱ्हाडीने मातेचा वध केला. आपल्या आज्ञेचं पालन केल्यामुळे जमदग्नी ऋषी प्रसन्न झाले. ते परशुरामांना म्हणाले, "मी तुझ्या वर प्रसन्न आहे, बोल तुला काय वर पाहिजे?" परशुराम म्हणाले, "मला तीन वर द्यावे" ऋषींनी तीन वर देण्याचं वचन दिले. परशुराम म्हणाले, "पहिला वर म्हणजे माझ्या मातेला पुनर्जीवित करावे. दुसरा वर म्हणजे तिच्या मृत्यूचं तिला विस्मरण व्हावे आणि तिसरा वर माझ्या बंधूंमध्ये पुन्हा चेतना यावी." अशा प्रकारे भगवान परशुरामांनी एकीकडे पित्याच्या वचनाचंही पालन केलं आणि आपल्या मातेला व बंधूनाही जीवित केलं; परंतु तरीही मातेच्या हत्त्येचं पाप त्यांच्या माथी लागलं. तो कलंक धुवून टाकण्यासाठी त्यांनी भगवान शिवाची उपासना केली. भगवान शिवजींनी त्यांना मातृकुंडात स्नान करण्यास सांगितले. त्याच्याने त्यांचं पापक्षालन झालं.

मातृकुंड हे ठिकाण सध्याच्या मेवाडमध्ये असून त्याला मेवाडचं हरिद्वार असंही म्हटलं जातं.

❖❖❖

# अनमोल वचन

या जगामध्ये परमात्म्याच्या ज्ञानाशिवाय सारं काही दु:खमय आहे, बंधनात टाकणार आहे, संत महापुरुष परोपकारी असतात .ते योग्य मार्ग दाखवतात. सर्वसामान्य मनुष्य जगातील सर्व वस्तू प्राप्त करण्याची इच्छा करतो .शरीर निरोगी राहावं म्हणूनही धडपडतोय परंतु तीस चाळीस किंवा पन्नास साठ वर्षाचं आयुष्य उपभोगून तो हा देह सोडून जातो. पण जीवाचा प्रवास मात्र जन्मोजन्मी अखंड सुरुच असतो. लक्ष चौऱ्यांशीच्या बंधनात अडकतो. त्याचा प्रवास कधीच थांबत नाही. म्हणून संत महात्मा म्हणतात भौतिक वस्तूंचा संग्रह करण्याआधी आत्म्याच्या कायमस्वरुपी निवासाची व्यवस्था केली पाहिजे. म्हणजे देहत्यागल्यानंतर जीव हा चौऱ्यांशीच्या बंधनात अडकणार नाही .तो आपल्या मूळ स्वरुपाला प्राप्त होईल. संत महापुरुष म्हणतात, "हे मनुष्या तू जर या निराकार प्रभु–परमात्म्याला विसरुन केवळ भौतिक वस्तूंनाच महत्त्व देत राहिलास तर खरं सुख तुझ्या वाट्याला येणार नाही. जसं, घर हे माणसांसाठी असतं, माणसं घरासाठी नसतात, वहाण ही पायांसाठी बनवलेली असते,पाय वहाणांसाठी नसतात. म्हणून प्राथमिकता आपण कोणाला दिली पाहिजे हे लक्षात घेतल्याशिवाय योग्य दिशा प्राप्त होत नाही .त्यासाठी ह्या नाम धनाची प्राप्ती करुन प्रभू परमात्म्याशी मनाचं नातं जोडलं तरच पूर्णत्व प्राप्त होतं. खऱ्या अर्थाने जन्म सार्थक होतो."

– बाबा हरदेवसिंहजी

## कॉम्प्युटर प्रोग्रामर व इंटरनेटचे जनक

# रे टॉमलिन्सन



संगणक क्षेत्रातील हे अग्रणी व्यक्तिमत्व आहे. मित्रांनो, आपण कॉम्प्युटरवर मोबाईलद्वारे हजारो ई–मेल पाठवत असतो त्यामुळे आपलं संवादाचं आणि पत्रव्यवहाराचं काम अतिशय सोपं झालेलं आहे; परंतु एवढं कठीण काम अतिशय सोपं करून दाखवणारं व्यक्तिमत्व आहे रेमॉंड सॅम्युअल रे टॉमलिन्सन! हे अमेरिकेचे कॉम्प्युटर प्रोग्रामर आहेत. त्यांनी ॲडव्हान्स रिसर्च प्रोजेक्टर्स नेटवर्क वर चालणारे ईमेल सिम बनवले. कॉम्प्युटर मध्ये आपण ई–मेल पाठवतो. त्यामध्ये ॲट द रेट (@) या चिन्हाचा वापर केला जातो. याचे हे सर्वेसर्वा जनक आहेत.

रेमॉंड यांचा जन्म २३ एप्रिल १९४२ रोजी न्यूयॉर्क येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण न्यूयॉर्कच्या सेंट्रल स्कूलमध्ये झाले. पुढे टेक्नॉलॉजीतून इंजिनिअरिंग मास्टर डिग्री मिळवली. ई–मेल मेसेजिंग सिस्टीम बनवल्यानंतरही ते समाधानी नव्हते. जेव्हा १९७१ मध्ये अर्पानेटसाठी ई–मेल प्रोग्राम विकसित केला, तेव्हा ईमेल प्रोग्रामने संपर्क क्षेत्रात जणू क्रांती घडवून आणली. लवकरच त्यांचा ई–मेल संपर्क मोठ्या कंपन्यांपासून ते दुकानदार, मित्र–मैत्रिणी, कुटुंबापर्यंत पोचला. समुद्र जमीन आणि आकाश ही सर्व ठिकाणं एका माऊस क्लिकवर त्यांनी बांधून टाकली. आज दिवसाला लाखो ईमेल कॉम्प्युटर मोबाईलद्वारे पाठवले जातात.

रे टॉमलिन्सनने पहिला ईमेल आपल्या समोरील कॉम्प्युटरवर पाठवला. दोन्ही कॉम्प्युटर अर्पानेटवर्कशी जोडले होते. पहिला ई–मेल मेसेज केवळ टेस्ट मेसेज होता. तो ऐतिहासिक ठरला. कारण तो अर्पोनेटद्वारा पाठवला होता. त्यालाच आज आपण इंटरनेट असे म्हणतो. दूरसंचार क्षेत्रातील या असाधारण संशोधनाकरता जगभरातील सर्वोत्कृष्ट पन्नास प्रभावशाली व्यक्तींच्या यादीत त्यांचे नाव समाविष्ट झाले आहे. त्यांनी साऱ्या विश्वाला संवादासाठी अतिशय सोपे साधन उपलब्ध करून दिले या व्यक्तीने संपूर्ण जगाला जवळ आणले. सर्व सीमा तोडून अंतराळ, महासागर आणि जमिनीला अदृश्य तरंगांनी जोडले. खरंच हे अद्‌भुत सत्य अशक्य कोटीची कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासारखं आहे.

रिमॉंड यांना जवळपास आठ ते दहा पुरस्कारांनी सन्मानित केले गेले. खरंच आज या जगात असे हे लोक असतात, जे विश्वाला बरंच काही देऊन आणि शिकवून जातात. अशा व्यक्तींचे समाजावर खूप ऋण असतात.

❖❖❖



कथा

# मैत्री म्हणजे त्याग

मित्रांनो, शाळेत असताना इतिहासामध्ये एक प्रश्न विचारला जाई. 'पंजाबचा सिंह' असे कोणाला म्हणतात? त्यावर लगेच उत्तर येत असे 'लाला लजपत राय!' लाला लजपतराय हे स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणी होते. सायमन कमिशनला विरोध करताना इंग्रजांनी केलेल्या लाठीमारात ते शहीद झाले. देशासाठी जसा त्यांनी त्याग केला, तसा मैत्रीसाठी देखील त्याग केला होता.

लालाजी विद्यार्थी असतानाची ही घटना आहे. गौरीप्रसाद नावाचा त्यांचा एक मित्र होता. तो खूप हुशार होता. वर्गात नेहमी त्याचा पहिला नंबर येई आणि लालाजींचा दुसरा नंबर असायचा. एकदा वार्षिक परीक्षेच्या वेळी गौरीप्रसादची आई आजारी पडली. तिची सेवा करण्यात गौरीप्रसादचा खूपसा वेळ जात असे. त्यामुळे त्याचा अभ्यास नीट झाला नाही. दुर्दैवाने वार्षिक परीक्षेला काही दिवस

असतानाच त्याची आई वारली. तो खूप दु:खी झाला; परंतु स्वत:ला सावरत परीक्षेला बसला. सगळ्यांना वाटलं, की या परीक्षेत गौरीप्रसादचा नंबर काही येणार नाही. लालाजींचाच पहिला नंबर येईल; परंतु निकाल लागल्यानंतर नेहमीप्रमाणे पहिला नंबर गौरी प्रसादचा आणि दुसरा नंबर लालाजींचा! सर्वांना मोठं कुतूहल वाटलं. वर्गशिक्षकांनी लालाजींचे पेपर्स तपासून पाहिले, तर त्यांनी अर्धवट प्रश्नपत्रिका सोडवलेल्या दिसल्या. शिक्षकांनी लालाजींना बोलावून त्याबाबत विचारले. लालाजी म्हणाले, "सर, गौरीप्रसाद खूप हुशार विद्यार्थी आहे; परंतु आईची देखभाल करण्यातच त्याचा सारा वेळ गेला. त्याला अभ्यासास वेळच मिळाला नाही. गौरी जर पहिला आला नसता तर त्याला स्कॉलरशिप मिळाली नसती. त्यामुळे त्याचं पुढचं शिक्षण थांबलं असतं. म्हणून जाणूनबुजूनच मी प्रश्नपत्रिका अर्धवट सोडवली; परंतु कृपया हे गौरीला मात्र सांगू नका. कारण तो माझा जिवलग मित्र आहे. त्याला अपराध्यासारखं वाटेल." लालाजींचं मित्रप्रेम पाहून शिक्षकांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. खरोखरच अडचणीच्या वेळी जो मदत करतो, निरपेक्ष बुद्धीने कोणत्याही प्रकारचा गाजावाजा न करता जो प्रेम करतो, तोच खरा मित्र असतो. वर्गशिक्षकांनी लालाजींना प्रेमाने जवळ घेत म्हटले, 'मैत्री म्हणजे त्याग' हे तू सिद्ध केलंस!

❖❖❖

# अनमोल वचन

सत्संग भवन एका शाळेप्रमाणे आहे. कारण ज्या ज्या वेळी आपण सत्संगाला येतो त्या त्या वेळी काही नवीन शिकायला मिळते. शिकण्याच्या भावनेचा कधी अंत होत नाही. लहानसा बालकसुध्दा खूप काही शिकवण देऊन जातो. म्हणून हेच सांगत आलो आहोत, की ही शिकवण सत्संग भवनपर्यंतच सीमित न ठेवता आपण जगामध्ये वावरत असतानाही याची चर्चा करायला पाहिजे. आपण संगतमध्येच या शिकवणीची चर्चा करतो, वास्तविक ही शिकवण दैनंदिन जीवनामध्ये आचरणात आणली पाहिजे. प्रत्येकाने आपला स्वभाव असा बनवला पाहिजे की आपले जीवनच इतरांसाठी शिकवण ठरावी. एखादी व्यक्ती आपल्याला पहिल्यांदा, दुसऱ्यांदा किंवा तिसऱ्यावेळी जरी भेटली तरी त्याच्यावर आपल्या जीवनाचा इतका प्रभाव पडला पाहिजे, की त्याच्या मनात आपल्याबद्दल इतके आकर्षण निर्माण व्हावे, की त्याला वाटावे हा माणूस इतर लोकांपेक्षा इतका वेगळा का आहे? याच्यात जरुर काही विशेष रहस्य आहे. बाबाजींची शिकवण आपल्या कर्मामधून, आपल्या वचनांमधून आणि आपल्या दैनंदिन व्यवहारातून प्रत्येक क्षणी दिसली पाहिजे.

– पुज्य माता सविंदर हरदेवजी महाराज



विचारपुष्प

# मनुष्यजन्माविषयी जिज्ञासा असावी

अनेकदा आपल्या मनात असा विचार येतो, की एखादी वस्तू आपल्याकडे नाहीये, ती जर आपल्याला मिळाली तर आपलं जीवन किती सुखमय होईल! आणि खरंच ती व्यक्ती किंवा ती वस्तू प्राप्त झाली तरी जीवनामध्ये पूर्ण सुख आलं असं वाटत नाही. या वस्तू काही क्षणासाठी सुखदायी वाटतात; परंतु सुखाच्या पलीकडची जी अवस्था आहे ती आनंदाची अवस्था आहे. ती प्राप्त होत नाही. जगातील भौतिक वस्तूंना एक मर्यादा असते, एक्सपायरी डेट असते. भले ती वस्तू असो किंवा व्यक्ती असो. सारं बदलणारं आहे. आता संध्याकाळ आहे, काही क्षणात रात्र होईल. कायमस्वरूपी सत्य आहे, ते म्हणजे हा परमात्मा! प्रत्येक क्षणी हा आहे तसाच आहे. कायमस्वरूपी राहणारा आहे. आपलं जीवन याच्यावर आधारित असेल तर मनाला कोणतीही अवस्था दुःख देत नाही.

ज्या ज्या वस्तू मिळाल्या, त्या परमात्म्याने दिलेल्या आहेत. जी गोष्ट परमात्माने दिलेली आहे, ती कधीही परत घेऊ शकतो. जर आपण असं मानलं, की हे शरीर माझं आहे, मग थोडंसं दुःख आलं तर आपण लगेच डॉक्टरांकडे का जातो? आपण स्वतःच त्यावर इलाज का करु शकत नाही? जर खरच शरीर आपलं असतं तर शरीरावर आपलं नियंत्रण राहिलं असतं; परंतु तसं नाहीये. चेहऱ्यावर सुरकुत्या पडणे, केस पांढरे होणे हे आपण थांबवू शकत नाही. हा देह, या साऱ्या वस्तू परमात्म्याने दिल्या. या जगात आपण आलोय तर जाणारच आहोत. जेवढ्या कालावधीसाठी त्या वस्तू दिल्या त्याचा सदुपयोग केला जावा. कधी कधी मनात असाही विचार येतो, की आपण तर कधी कोणाचं वाईट केलं नाही, तर मग परमात्माने माझ्या बाबतीत असं का केलं? वास्तविक परमात्मा कोणाचं वाईट करत नाही. आपल्या मतानुसार झालं नाही तर त्याला आपण 'वाईट' ठरवून मोकळं होतो.

आपण या मानव देहात आलोय, तर कशासाठी आलो? मनुष्य सर्वांमध्ये श्रेष्ठ आहे. असं काय आहे त्याच्यात? पशू–पक्षी देखील आपलं भोजन प्राप्त करतात, पक्षी

घरटं बांधून राहतात. मग माणसात असं काय वेगळेपण आहे? निद्रा आणि भय सगळ्यांना सारखंच आहे; परंतु मनुष्यामध्ये एक वेगळी गोष्ट हीच आहे, की मनुष्य जन्मात ब्रह्मज्ञानाद्वारे परमात्म्याला जाणता येतं, पाहता येतं. एकदा का या प्रभूला जाणलं, की मग हा सर्वत्र दिसू लागतो. मन विशाल होतं. मन सर्वांना स्वीकारत जातं. कोणाचा स्वभाव कसाही असो; मन सर्वांना त्याच दृष्टीने पाहतं, की मी जसा आहे तसा तो देखील परमात्म्याची रचना आहे. मग कुठल्या गोष्टीचा द्वेष करायचा? हा परमात्मा जसा आपल्यामध्ये आहे तसा सर्वांमध्ये आत्मारुपाने आहे. आपण या जगात जन्माला आलो आहोत, तर मनात जिज्ञासा हवी, की परमात्म्याला कसं प्राप्त करायचं? बालपण हे खेळण्यात, शिक्षण घेण्यात जातं. पुढे संसार, घरदार सांभाळण्यात आणि वृद्धत्वात देहाचा त्याग. हेच जीवन आहे का? नाही, जीवनाची यात्रा केवळ एवढीच नाहीये. आत्म्याची भूक ब्रह्मज्ञान आहे. त्यामुळेच त्याची जन्म–मृत्यूची भटकंती थांबणार आहे. देह हे आत्म्याचं तात्पुरतं निवासस्थान आहे.

परमात्म्याला प्राप्त करण्याची जिज्ञासा कशी असावी, याची एक गोष्ट दासी नेहमी सांगत असते. एक व्यक्ती आपल्या गुरुला म्हणते, की मला परमात्माप्राप्तीची खूप जिज्ञासा आहे. जिवंतपणीच मला मुक्ती प्राप्त करून घ्यायची आहे. तेव्हा त्याचे गुरु त्याचं तोंड पाण्यात थोडा वेळ दाबून धरतात. नंतर तोंड बाहेर काढल्यावर त्याला विचारतात, जेव्हा तुला पाण्यात श्वास घेता येत नव्हता, तेव्हा तुझी सगळ्यात मोठी इच्छा कोणत्या वस्तूच्या प्राप्तीची होती? त्यावर ती व्यक्ती म्हणते, त्या क्षणी मला फक्त श्वास घेता यावा हीच एक प्रबळ इच्छा होती.तेव्हा गुरुदेव त्याला समजवतात, की परमात्म्याच्या प्राप्तीसाठी देखील अशीच जिज्ञासा, तळमळ असावी. काहीही मिळालं नाही तरी चालेल, फक्त परमात्मा पाहिजे. हीच खरी जिज्ञासा आहे. जिवंतपणी आपल्याला आणखीही काही कामं पूर्ण करायची असतात. उदाहरणार्थ, घर परिवार सांभाळणं, शाळा, ऑफिस या साऱ्या जबाबदाऱ्या पार पाडणं इ. तर मग या गोष्टींचा त्याग करायचा का? तर नाही. अर्थात हे सर्व करत असतानाही भक्ती होत राहते. जसं, श्वास घेणे, पापण्यांची उघडझाप, हृदयाची धडधड सुरु ठेवणे हे आपण आपल्या इच्छेने करू शकत नाही, या क्रिया सदैव घडतच असतात. तशी या दातार प्रभूची भक्ती प्रत्येक कार्य करत असताना होत राहते. जर आपलं आपल्या कार्यावर, व्यक्तींवर प्रेम असेल, तर ती प्रेमाभक्ती होते. फक्त त्याचा पाया, त्याचा आधार निराकार असावा. निराकाराच्या अनुभूतीत केलेलं काम हे काम नाही, तर सेवा बनते.

जेव्हा या प्रभूशी, या देवाशी एकरुप अवस्था प्राप्त होते तेव्हा आपल्या मध्ये मानवी गुण आपोआप येऊ लागतात. मनात दया, करुणा, प्रेम, स्नेह हे गुण प्रत्येक क्षणी दिसू लागतात. जसं आपल्या शरीरावर कुठेही ओरखडा लागला तर रक्तच बाहेर येतं, कारण शरीराच्या प्रत्येक भागात रक्तच साठलेलं आहे. तसं, आत्मिकता जीवनात असेल तर मानवताच प्रकट होत राहील.

❖❖❖



### जागतिक पुस्तक दिनानिमित्त

# पुस्तकरुपी अनमोल देण



पुरातन काळी ग्रंथ लिहिले, ऋषी मुनींनी भूर्जपत्रावर
ज्ञानसाधना करण्यासाठी, भर होता पाठांतरावर

रंगरुप आणि आकार बदलला,
पुस्तकरूप आता झाले साकार
बहुरंगात बहुढंगात बहुभाषेत
घेऊनि आले ज्ञानाचे भांडार

एकाकी असता साथ देतात
पुस्तकंच आपले खरे मित्र
शब्दांपेक्षा अधिक बोलतात
त्यांच्यामधील रंगीत चित्र



ज्ञानखजिना रिता करुनी
मार्गदर्शनही नित्य करती
संदर्भासह स्पष्टीकरण देण्या
सदा सदा तत्पर असती

कालपरत्वे रुप बदलून
पुस्तक आले पडद्यावरती
हवे तेव्हा हवे ते पुस्तक
शोधून वाचती नेटवरती



वाचनाची खरी गंमत आहे
खऱ्याखुऱ्या पुस्तकांमध्ये
आप्तजनांना विविध प्रसंगी
भेट म्हणून देण्यामध्ये

वाचनाने घडतो माणूस, वाचनाने घडते जीवन
वाचू आणि वाचवू या, पुस्तकरुपी अनमोल देण



– रश्मी थोरात

# दादाला विचारु या..!

## प्रश्न आपल्या मनातले, उत्तर सद्गुरु बाबाजींचे

प्रश्न : मानवा–मानवात एकत्व कसे स्थापित होऊ शकेल?

उत्तर : ज्यावेळी 'एक पिता एकस के हम बारक' अर्थात आपल्या सर्वांचा पिता एक परमात्माच आहे याचीच आपण सारी लेकरं आहोत याचा बोध जेव्हा ब्रह्मज्ञानाद्वारे होईल तेव्हा प्रत्येक जण एक दुसऱ्यामध्ये आत्मस्वरूप पाहू लागेल. जो परमात्मा निराकार, निर्गुण, निर्लेप, रंग–रूप–वर्णातीत आहे असा परमात्मा सर्वांमध्ये आहे, ही दृष्टी जेव्हा प्राप्त होते, तेव्हा कोणीही परका वाटत नाही. मन विशाल परमात्माशी जोडलं जाऊन विशाल होतं. सर्वांना स्वीकारण्याचा भाव येतो. कोणामध्येही दोष दिसत नाही. सारे भेद दूर होतात. मानव मानवाच्या जवळ येऊ लागतो. त्यातूनच मानवामानवात एकत्व स्थापित होतं.

प्रश्न : परमात्मा प्राप्तीचा सोपा उपाय कोणता?

उत्तर : गुरुवाक्यावर दृढ विश्वास. जसे, एखाद्या अथांग सागरात उसळणाऱ्या लाटांवर एखादा मनुष्य वर खाली होत आहे, पोहताना त्याची दमछाक झाली आहे, श्वास घेण्यासाठी तो व्याकुळ आहे, त्याच क्षणी एखादी नौका यावी आणि त्याचं रक्षण व्हावं तसं गुरूचं वचन हे त्या नौकेसमान आहे. म्हणून गुरुवाक्यावर दृढ राहावे.

प्रश्न : परमात्मा निर्गुण निराकार आहे. मन–बुद्धिने जाणता येत नाही, मग त्याचे अस्तित्व कसे जाणवेल?

उत्तर : परमात्म्याचे अस्तित्व एखाद्या मानवी देहाद्वारे जाणवत असते. त्या देहाला सद्गुरु म्हटले आहे. अशा अवतारी पुरुषाशी ज्याची भेट झाली, त्याला परमात्म्याची भेट झाली असे समजावे.


प्रश्न : ज्ञानाची प्राप्ती कोणाला होते?

उत्तर : बरेचदा असं ऐकायला येतं, की ज्ञान घेऊनही आमच्या जीवनात सुख नाही, आनंद नाही. तेव्हा असे समजावे, की त्यांना केवळ ज्ञानाचा परिचय झाला आहे; परंतु त्यांनी ज्ञानाची प्राप्ती केली नाही. ज्ञानाची प्राप्ती त्यालाच होते जो ज्ञानानुसार जीवन घडवतो, त्याच्यावर अमल करतो. त्याच्याच हृदयात ज्ञानाची ज्योत प्रकट होते. यासाठी गुरूवर श्रद्धा हवी. कारण श्रद्धावान लभते ज्ञानम्' असे गीतेत ही म्हटले आहे.



# शब्दकोडे २१७

○ विकास अरोडा ( रेवाडी-हरियाणा )



## आडवे शब्द

2. गुजरातमधील एक शहर (अजमेर / वडोदरा)
4. ‘पन्हाळगड’ हा किल्ला कोणत्या जिल्ह्यात आहे ?
5. या वाक्यात लपलेल्या एक देशाचे नाव शोधा ‘नालंदा बिहारमधील प्राचीन बौद्ध विद्यापीठ आहे.’
7. लीप वर्षाच्या एकूण दिवसांपैकी 57 दिवस कमी
10. पंडित रविशंकर हे संगीत क्षेत्रातील सुप्रसिद्ध ........ वादक होते
12. वरण, भाजीमध्ये वापरण्यात येणारा पिवळा पदार्थ
14. फुलातील मध गोळा करणारा कीटक
15. क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे जन्मस्थान रायगड जिल्ह्यात कोठे आहे ?

## उभे शब्द

1. ‘राष्ट्रीय क्रीडा दिन’ ....... ऑगस्टला साजरा करतात
2. हनुमंताला अमरत्वाचे ....... होते
3. देहदानाचा आदर्श म्हणून पुराणातील कोणत्या ऋषीचा उल्लेख केला जातो?
6. संत निरंकारी मिशनचे पाक्षिक वृत्तपत्र ‘एक .......’
8. तलाव किंवा साठलेल्या पाण्यावरती हिरव्या रंगाचे साठलेले असते
9. साखर कशा पासून बनते ?
11. तापमान मोजण्याचे साधन
12. गैरहजरच्या विरुद्ध
13. खालीलपैकी कोणते क्षेत्र केंद्रशासित प्रदेशात मोडते ? बिहार, दमण, पंजाब, आसाम

उत्तरे इतरत्र



## वैज्ञानिक प्रश्नोत्तरे

**प्रश्न : कोंबडीच्या अंड्याची रचना कशी असते ?**

**उत्तर :** कुठलेही अंडे हे अंडाकृती असते. हा अंडाकृती आकार चेंडूप्रमाणे गोल नसतो किंवा लंबगोलाकारही नसतो. बाहेरच्या बाजूला अंड्याचे कवच असते. आतल्या बाजूला एक पातळ पापुद्रा असतो. या पापुद्र्याच्या फुग्यासारख्या पिशवीमध्ये पांढरा रस असतो. कवच व पापुद्र्याची पिशवी यात हवेची पोकळी असते. पांढऱ्या रसात पिवळा बलक असतो. तो दोन स्नायूच्या धाग्याने लोंबकळत ठेवलेला असतो. ती सुध्दा पिशवीच असते. अंडे कसेही घरंगळले तरी बलकातला गर्भ/जीव मंदपणे झोके घेत राहतो.

प्रश्न : कोरड्या केलेल्या काचेच्या पेल्यात बर्फाचे खडे टाकले तर थोड्या वेळाने पेल्याची बाहेरची बाजू ओलसर का होते ?

**उत्तर :** पेल्याच्या भोवती हवा असते. ह्या हवेत पाण्याची वाफ समावलेली असते. पेल्यामध्ये बर्फ घातल्याने पेल्यातील व पेल्यालगतची हवा खूप थंड होते. बाहेरील हवेतील पाण्याच्या वाफेचे रुपांतर पाण्याच्या थेंबात होते व ते थेंब पेल्याच्या बाहेरच्या पृष्ठभागावर जमा होतात. त्यामुळे पेला बाहेरुन ओला झालेला दिसतो.

प्रश्न : काजवा रात्री कसा चमकतो ?

**उत्तर :** काजव्याच्या पोटाच्या खालच्या बाजूला प्रकाशनिर्मिती करणारा भाग असतो आणि मज्जेद्वारे त्याचे नियंत्रण होते. त्यात 'ल्युसिफेरीन' आणि 'ल्युसिफेरस' नामक रसायने असतात. ल्युसिफेरिनचा ऑक्सिजनशी संयोग झाल्याने प्रकाश निर्मिती होते. ल्युसिफेरस क्रियाप्रेरक म्हणून काम करतो. अशा प्रकारच्या प्रकाश निर्मितीच्या प्रक्रियेला 'जीवदिप्ती' असे म्हणतात. काजव्यातून उत्सर्जित होणारा प्रकाश पिवळा किंवा नारिंगी असतो.

प्रश्न : कुत्र्या-मांजरासारखे प्राणी कधी कधी कोवळे गवत खाताना का आढळतात ?

**उत्तर :** कुत्र्या-मांजरासारखे प्राणी जेव्हा त्यांना मलावरोधचा अतिरेक होतो त्यावेळी कोवळे गवत खातात. कारण वनस्पतीजन्य तंतूमय पदार्थ मलावरोध दूर करतात. माणसाला हा पदार्थ पालेभाज्यातून मिळतो. काही वेळा वाघ, सिंह, लांडगे हे प्राणी मारलेल्या भक्षाचे केसाळ भाग खाऊन मलावरोध दूर करतात. केसांना त्यांचे शरीर पचवू शकत नाही. त्यामुळे वनस्पतीजन्य तंतूमय पदार्थांचे काम हे केस करतात.



# आजोबा

चित्रांकन
लेखन, रंग
अजय कालडा









हिवाळ्यात त्या बागेतील तलाव गोठून जात. टेकड्यांवर बर्फ जमा होई. त्यावेळी राक्षस आपल्या गुहेत बसून वसंत ऋतू येण्याची वाट पाही.


एके दिवशी राक्षसाने काही मुलांना बागेत खेळताना पाहिले. त्याला खूप राग आला. या बागेत पुन्हा यायचे नाही असे सांगत त्याने मुलांना धमकावले.



आपल्या पश्चात मुलांनी बागेत येऊ नये म्हणून त्याने बागेच्या भोवती उंचच उंच भिंत बांधली.


बागेमध्ये त्याने एक सूचना फलकही लावला, या बागेत येणाऱ्याला मृत्यूदंड दिला जाईल.
या बागेत येणाऱ्याला मृत्यूदंड दिला जाईल.


हिवाळा संपून उन्हाळा सुरु झाला. वसंत ऋतूत सगळीकडे हिरवळ पसरली. पक्षी आनंदाने बागडू लागले. पण राक्षसबाग मात्र थंडीने गारठलेली होती.


राक्षस आपल्या गुहेतून रोज बाहेर येऊन वसंत ऋतुची वाट पाहत असे. पण बागेत सगळीकडे शुकशुकाट दिसे. तलाव गोठलेलच असत.


एके दिवशी राक्षसाला कोकिळेचे गोड गाणे ऐकू आले. बाहेर बर्फ वितळलेले दिसले. झाडे आनंदाने डोलत होती.
पक्षी किलबिलाट करत होते, त्याला खूप आनंद झाला. राक्षस त्या बागेत आनंदाने नाचू लागला. तेवढ्यात –
राक्षसाला मुलांच्या खेळण्याचा आवाज ऐकू आला. तो मुलांना मारायला धावला. मुले घाबरुन भिंतीच्या फटीतून बाहेर पळाली.
मुलं निघून गेल्यावर बागेतील आनंदाचे वातावरणही दूर झाले. तलाव गोठले. पक्षी दूर उडून गेले, झाडं गारठली.
काही दिवसांनी पुन्हा मुलांना खेळताना राक्षसाने पाहिले. पण तो त्यांना रागावला नाही. कारण त्याला कळून चुकले, की मुले खेळायला आली तरच बागेत आनंदाचे वातावरण तयार होते. झाडे डोलतात, पक्षी गातात. आता मुले तेथे रोज खेळतात. राक्षसबाग आता मुलांची बाग बनली.



# कर्मानुसार गती

महर्षी वेद व्यास हे अखिल विश्वाशी एकरूप झालेले असे ब्रह्मस्वरूप महात्मा होते. त्यांनी सहा शास्त्रं, अठरा पुराणांची निर्मिती केली. महाभारतासारखा महान ग्रंथ लिहिला. त्यांना जीवसृष्टीतील सर्व जीवांची भाषा अवगत होती.

एकदा महर्षी वेद व्यास रस्त्याने जात असताना त्यांना रस्त्यात एक कीटक वेगाने सैरावैरा धावत असताना दिसला. घाबरुन तो लपण्यासाठी जागा शोधत होता. आपल्यामुळे एखादा जीव भयभीत व्हावा, हे पाहून महर्षींना दुःख झाले. महर्षी त्या किटकाला म्हणाले, एवढं घाबरून पळायला काय झालं? कीटक म्हणाला, तुमच्या पावलांचा आवाज ऐकून मी घाबरलो. मी तर एक साधारण जीव आहे. कोणाच्याही पायाखाली येऊन चिरडून मरू

(पान २२ वर)

रोहितकिशोरखुडे



# मानवतेचं लक्षण

चंदू हा आई–वडिलांचा एकुलता एक मुलगा. आई – वडिलांचा अतिशय लाडका; परंतु लाडाकोडाने मुलं बिघडतात तसा चंदू अजिबात नव्हता. तो अतिशय समजदार आणि प्रेमळ होता. घरामध्ये सर्व सुखसोयी होत्या. कुठल्याही गोष्टींची कमतरता नव्हती. त्याच्या वाढदिवसाला बाबांनी त्याला विचारले, “चंदू! तुला वाढदिवसाला काय भेट देऊ?” चंदू म्हणाला, “मला कुत्र्याचं पिल्लू पाळायचं आहे.” बाबा म्हणाले, ठीक आहे. त्यांनी आपल्या ड्रायव्हर सोबत चंदूला जायला सांगितले. चंदू गाडीत बसून कुत्र्याचं पिल्लू विकत घेण्यासाठी दुकानात गेला. त्या ठिकाणी चार गोंडस पिल्लं बसलेली होती. चंदूला ती फारच आवडली. त्यातील एक

पिल्लू कोपऱ्यात एकटंच बसलेलं होतं. चंदूने त्या पिलांची किंमत विचारली. दुकानदार म्हणाला, प्रत्येकी आठशे रुपये. चंदूने विचारलं, ही सर्व पिल्लं एकाच आईची आहेत का? दुकानदार होय म्हणाला. त्यावर चंदूने शंका प्रकट करत पुन्हा विचारलं, सर्व एकाच आईची पिल्लं आहेत, मग त्या एका पिल्लाला एका बाजूला कोपऱ्यात का बसवलं? दुकानदार म्हणाला, ते पिल्लू अपंग आहे. त्याला एक पाय नाही त्यामुळे ते बाजूला ठेवलं आहे. चंदू म्हणाला, मग आपण या पिलाचं पुढे काय करणार आहात? दुकानदार म्हणाला, आम्ही त्याला थोड्या दिवसांनी रस्त्यावर सोडून देऊ. हे ऐकल्यावर चंदू दुकानदाराला म्हणाला, काका, मला हेच पिल्लू विकत घ्यायचंय. त्याने दुकानदाराला आठशे रुपये दिले. दुकानदार म्हणाला, हे पिल्लू विक्रीसाठी नाहीये. त्याचे पैसे नकोत. असंच घेऊन जा. तरीही चंदूने दुकानदाराला पैसे घ्यायला लावले. दुकानदाराला चंदूचं मोठं नवल वाटलं. त्याने चंदूला विचारलं, बाळ एवढी चांगली पिल्लं असताना तू हे अपंग पिल्लूच का बरं निवडलं? त्यावर चंदूने काही न बोलता आपली पॅन्ट वर केली. दुकानदाराने पाहिलं, चंदूचा देखील एक पाय लाकडी होता. चंदू म्हणाला, ईश्वराच्या कृपेने माझे आई–वडील सधन आहेत. ते माझा चांगला सांभाळ करत आहेत; परंतु या पिल्लाला तर कोणीच नाही. पुढे याचा सांभाळ कोण करणार?

स्वतःवरुन दुसऱ्याचं दुःख जाणणं, प्राणिमात्राविषयी कणव वाटणं, सहृदयता हेच खरं मानवतेचं लक्षण आहे.

❖❖❖

## कर्मानुसार गती (पान २० वरुन)

शकतो.म्हणून जीव वाचवण्यासाठी मी पळत होतो. महर्षी म्हणाले, मृत्यूला एवढं का घाबरतोस? तुला मृत्यू आला तर तुझ्यासाठी ही चांगलीच गोष्ट आहे. निदान या किटकाच्या जन्मातून तुझी सुटका होईल आणि पुढे तुला चांगला जन्म मिळेल. कीटक म्हणाला, ऋषीवर! मी या जन्मात सुखी आहे. मला मृत्यूची भीती वाटते! महर्षींनी त्याला सांगितले, की जन्ममृत्यु तर प्रत्येक जीवाला येणारच आहे. तुला पुढील जन्म मानवाचा मिळेल असा मी तुला आशीर्वाद देतो. या जन्मात तू जी सुखं प्राप्त करू शकला नाहीस, ती सारी सुखं तुला मनुष्य जन्मी प्राप्त होतील. तू उच्च कोटीचा साधक होऊन या विश्वाशी एकरूप होऊ शकशील. मग तुला पुन्हा पुन्हा जन्म मृत्यूचं दुःख भोगावं लागणार नाही.

कीटक म्हणाला, ऋषीवर कोणत्या कर्माची शिक्षा म्हणून मला हा किटकाचा जन्म मिळाला? महर्षींनी किटकाला पूर्वजन्मीचे स्मरण करुन दिले. पूर्वजन्मी तो एक धनाढ्य गृहस्थ होता; परंतु त्याने धर्मविरोधी काही कृत्य केली. निरपराधांना चिरडून मारले. त्यामुळे त्याला कीटक योनी प्राप्त झाली.

कीटक ऋषींना शरण जात म्हणाला, कृपया मला या कीटक योनीतून मुक्त करावे. महर्षींच्या कृपेने त्याला मनुष्यजन्म प्राप्त झाला. ब्रह्मज्ञानी महात्म्यांची कृपादृष्टी प्राप्त झाली, की उद्धाराचा मार्ग मोकळा होतो.

❖❖❖

# पद्म पुरस्कार

पद्म पुरस्कार हे भारत सरकारकडून देण्यात येणाऱ्या सर्वोच्च नागरी पुरस्कारापैकी पुरस्कार आहेत. हा सन्मान राष्ट्र सेवांकरिता दिला जातो. या सेवांमध्ये कला, साहित्य, विज्ञान, सार्वजनिक सेवा आणि खेळ यांचा समावेश होतो. प्रत्येक वर्षी गणराज्य दिनाच्या पूर्वसंध्येला हे पुरस्कार जाहीर करण्यात येतात. प्रतिवर्षी मार्च–एप्रिल महिन्यात हे पुरस्कार प्रदान करण्यात येतात. यामध्ये राष्ट्रपतींची स्वाक्षरी असलेले पुरस्कार पत्र (सनद) तसेच एक पदक यांचा समावेश असतो.

### पद्म पुरस्कारांचे वर्ग

पद्म पुरस्कार वेगवेगळ्या तीन वर्गात प्रदान करण्यात येतात.

१) पद्मविभूषण – असामान्य आणि विशेष कार्यासाठी

२) पद्मभूषण – उच्चस्तरीय विशेष कार्यासाठी

३) पद्मश्री – विशेष कार्यासाठी

### निवड प्रक्रिया

पद्म पुरस्कारासाठी व्यक्तींची निवड करण्यासाठी भारताच्या पंतप्रधानांकडून प्रतिवर्षी एक समिती नियुक्त करण्यात येते. या समितीला पद्म पुरस्कार समिती असे म्हणतात. मंत्रिमंडळ सचिव हे या समितीचे प्रमुख असून, गृहसचिव, राष्ट्रपतींचे सचिव, 

चार ते सहा ख्यातनाम व्यक्ती या समितीत सदस्य म्हणून समाविष्ट असतात. ही समिती आलेल्या नामांकनातून पुरस्कारासाठी नावे निश्चित करते, आणि ही नावे समितीद्वारे पंतप्रधान आणि राष्ट्रपती यांना मान्यतेसाठी सादर करण्यात येतात.

### नामांकन प्रक्रिया

पद्म पुरस्कारासाठी आलेल्या नामांकन यादीतून निवड करण्यात येते नामांकनाची ही प्रक्रिया सार्वजनिक स्वरूपाची असून व्यक्ती स्वतःचे नावही या पुरस्कारासाठी सुचवू शकते. हे पुरस्कार साधारणपणे भारतीय नागरिकांना दिले जात असले तरी क्वचित परदेशी व्यक्तींनाही दिले जातात.

### प्रथम मानकरी

१) पद्मविभूषण – श्री. सत्येंद्रनाथ बोस
(साहित्यिक, पश्चिम बंगाल)

२) पद्मभूषण – श्री. अयोध्या नाथ खोसला
(विज्ञान आणि अभियांत्रिकी, दिल्ली)

३) पद्मश्री – श्री. डॉ. वीरभान भाटिया
(वैद्यकीय, दिल्ली)

# जागतिक पुस्तक दिन



मित्रांनो, ‘ग्रंथ आपले गुरु’ किंवा ‘पुस्तक माझा मित्र’ तसेच ‘वाचाल तर वाचाल’ अशी अनेक घोषवाक्ये आपण ऐकली असतील; परंतु ही सारी घोषवाक्ये कागदावरच राहिली. ती प्रत्यक्षात उतरावी, वाचन संस्कृती टिकावी यासाठी अनेक प्रयत्न केले जात आहेत. त्यापैकीच एक प्रयत्न म्हणजे ‘पुस्तक दिन.’

सध्याच्या युगात लोकांमध्ये पुस्तक वाचनाची गोडी कमी होत आहे. इंटरनेटवर पाहिजे असेल ती माहिती सहज उपलब्ध होत असल्याने लोक पुस्तकांपासून दूर जात आहेत आणि मोबाईल जवळ करत आहेत. पूर्वी लोक माहितीसाठी पुस्तकांवर अवलंबून असत. त्यामुळे त्यांच्या घरात पुस्तकांचा संग्रह असायचा; पण आता मात्र परिस्थिती बदलली आहे. म्हणून लोकांमध्ये पुस्तक वाचनाची गोडी निर्माण व्हावी यासाठी जागतिक पुस्तक दिन साजरा केला जात आहे. पुस्तक वाचन दिनाची थीम असते, आर यू रीडर? म्हणजे तुम्ही वाचक आहात का?

पुस्तक वाचन दिन २३ एप्रिल रोजी साजरा करण्यामागे कारण असे आहे, की अनेक थोर लेखकांचा मृत्यू किंवा जन्म हा २३ एप्रिल या दिवशीच झालेला आहे. त्यांच्या स्मरणार्थ हा दिवस पुस्तक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. थोर साहित्यिक विल्यम शेक्सपियर यांचा मृत्यू आणि मॅन्युअल मेजिया वालेजो यांचा जन्म हा २३ एप्रिल रोजीच झाला.

हा दिवस पहिल्यांदा २३ एप्रिल १९२३ रोजी स्पेनमधील पुस्तक विक्रेत्यांनी साजरा केला. त्यानंतर १९९५ मध्ये पॅरिसमध्ये युनेस्कोने सर्वसाधारण सभेत जगभरातील लेखकांना आदर व श्रद्धांजली वाहण्यासाठी हा दिवस ‘जागतिक पुस्तक दिन’ म्हणून साजरा केला जाईल असे घोषित केले. जगभरातील लेखकांना सन्मान देण्याचा यामागे उद्देश आहे.

अनेक ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारे हा दिवस साजरा केला जातो. काही ठिकाणी वाचन स्पर्धा घेतल्या जातात, तर काही ठिकाणी लेखन स्पर्धा घेतली जाते. तर एकमेकांना पुस्तकं भेट देऊनही साजरा केला जातो.

याच उद्देशाने संत निरंकारी मंडळात देखील मिशनची अत्यंत गुणवत्ता असलेली आध्यात्मिक पुस्तकं नाममात्र किमतीत विकली जातात. ती आपण अवश्य वाचली पाहिजेत आणि वाढदिवस किंवा इतर काही प्रसंगी भेट म्हणूनही दिली पाहिजेत, हीच या दिनानिमित्त अपेक्षा आहे.

❖❖❖



# विशालतेनेच एकत्व

या धरतीवर जेवढे संत महात्मा महापुरुष आले त्यांनी समाजाला दूर लोटलं नाही. त्यांनी जोडण्याचंच काम केलं. एखाद्या कुंडीत जर वडाचं रोपटं लावलेलं असेल तर त्याचा मोठा वटवृक्ष होईल का? तो आभाळाची उंची गाठू शकेल का? नाही. विशाल धरतीवरच ते विशाल वृक्षाचं रूप घेऊ शकतं. तसं, मनामध्ये संकुचितपणा असेल तर मानव कधीही मानवाशी जोडला जाणार नाही.

समजा, एखाद्या विहिरीमध्ये एक बेडूक पाण्यावर तरंगत आहे. त्या बेडकाने आकाशाकडे पाहिलं, तर त्याला फक्त विहिरीचे कठडे आणि थोडंफार निळं आकाश दिसेल; परंतु जेव्हा पाऊस पडल्यावर विहिरीतील पाण्याची पातळी वाढेल, विहीर काठोकाठ भरली, की मग त्याला विशाल आकाशही दिसू लागेल. पर्वतशिखरं दिसू लागतील. विशालतेशी मनाचं नातं जोडल्यानेच विशालता येऊ शकते. जात–पात आणि संकुचित भावना यापासून आपण वर यायला हवे. सर्वांसाठी जमीन एकच आहे, पाणी, हवा एकच आहे, परमात्मा एकच आहे. फक्त खाण्यापिण्यात, वेशभूषेत, भाषेत विविधता आहे. या विविधतेत एकता पाहणं हा तर भारतीय संस्कृतीचा महान गुण आहे.

खरं म्हणजे धर्म जोडण्याचं काम करतो. पुरातन इतिहास देखील आपल्याला हेच शिकवतो की इथं मंथराही आहेत. मनामनात दुरावा निर्माण करणाऱ्या. द्वेष निर्माण करणाऱ्या. भगवान श्रीरामावर जीव ओवाळून टाकणाऱ्या कैकयीच्या मनात विष कालवणाऱ्या. अर्थात मंथरा ही स्त्री होती, म्हणून हे काम फक्त स्त्रिया करतात असं नाही, ते मानवी मनाचं एक रुप आहे.ते बदलायला हवं. मानवा मानवामध्ये वास्तविक एकता तेव्हाच येते जेव्हा ते एक परमपिता परमात्म्याला जीवनात धारण करतात. जोपर्यंत आपल्या सर्वांचं नातं या एका प्रभूशी जोडलं जात नाही तोपर्यंत एक मनुष्य दुसऱ्या मनुष्यापासून वेगळाच राहील. यासाठी सर्वांना ज्ञानाच्या धाग्यात ओवून ठेवलं तरच त्याला मानवतेचं एक सुंदर रूप येईल.

❖❖❖





# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



किआन पांडूळे



अवनी शिर्के




अद्वीता तोडस्कर



अभिनीती जाधव



रितेश परब



पृथ्वी भडाणे



स्वरा मिंचेकर



आरोही नाईक



सचिन भूगोल



देवांश पोंदे



एकता पाटील



आलोक भाकी



पलक शिनकर



भवंश कुवरे



अनय बोराटे



पृथ्वी कोळी



नेत्रा पुंगावकर



कल्याणी कुलकर्णी



पारस खडक्कर



सुदीप बने



अवधूत सावंत




वैदेही शेळके




समीप पाटील



वर्धा मेस्त्री



राश्मिका पाडळे



विधीता विरकर



आरोही जाधव



आनंदी जाधव



# शिल्पकलेचा अप्रतिम नमुना
# ऐतिहासिक भुलेश्वर मंदिर (माळशिरस)

पुण्याजवळ पुरंदर तालुक्यातील माळशिरस येथे भुलेश्वर हे प्राचीन मंदिर असलेलं एक ऐतिहासिक ठिकाण आहे. मूलतः हे ठिकाण मंगलगड असे होते. तेराव्या शतकात देवगिरीच्या यादवांनी अनेक हेमाडपंती मंदिरे निर्माण केली याच शतकात भुलेश्वर मंदिराचे बांधकाम झाले असावे. मंदिराच्या भिंतीवरील शिल्पात कोरीव काम व मूर्ती काम अद्वितीय आहे. लढाईच्या काळात येथे बरीच तोडफोड झालेली आहे गाभाऱ्यात शिवलिंग फक्त पूजेसाठी ठेवण्यात येतं.

मंदिराची रचना अर्ध खुला मंडप, अंतराळ आणि गर्भगृह असा आहे. मंदिराचे गर्भगृह खोल असून समोर काळ्या दगडातील कोरीव काम केलेला नंदी आहे. मंदिरातील बांधणी तेराव्या शतकातील असून





भिंत नगारखाना शिखरे अठराव्या शतकातील आहेत. या मंदिरात मोठ्या प्रमाणात मानवी व देवतांची शिल्पे आहेत. भिंतीवर युद्धप्रसंग, हत्ती, सिंह इत्यादी प्राणी रामायण महाभारतातील प्रसंग कोरलेले आहेत. ही कथाशिल्पे जिवंत वाटतात. मंदिर पाहताना वेरूळचे कैलास मंदिर आणि लेणी पाहतोय असं वाटतं म्हणूनच या मंदिराला पुण्याचे वेरूळ असे म्हटले जाते.

इ. स. १६३४ मध्ये विजापूरचा सरदार मुरार जगदेव यांनी या डोंगरावर दौलत मंगळ नावाचा किल्ला बांधला. इथे पहिली बाजीराव पेशवे व सातारचे शाहू महाराज यांनी अनेक हेमाडपंथी मंदिरांचा जीर्णोद्धार केला. दरवर्षी भुलेश्वर मंदिरात २७ मार्च ते २९ मार्च असा तीन दिवस किरणोत्सव असतो तो पाहण्यासाठी मोठ्या संख्येने गर्दी होते. सकाळी ६ वाजून ५१ मिनिटांनी सूर्यकिरणांनी गाभाऱ्यात प्रवेश केला तर सात वाजून एक मिनिटांनी ते भुलेश्वरच्या मूर्तीला स्पर्श करतात साधारण बारा मिनिटे सूर्यकिरणांचा अभिषेक मूर्तीवर होतो.

भुलेश्वर महादेव मंदिरातील शिल्पे शिल्पसौंदर्याचा उत्तम आविष्कार आहेत. पुरातत्त्व खात्याने हे महत्त्वाचं मंदिर राष्ट्रीय संरक्षित स्थळ म्हणून घोषित केले आहे. पुण्यापासून अंदाजे ५० किलोमीटर अंतरावर हे ठिकाण आहे.

❖❖❖





# हसा मुलांनो हसा

शिक्षक : अनिल, सुनील मी तुम्हाला गाईवर निबंध लिहून आणायला सांगितला होता, तुम्हा दोघा भावांचा निबंध अगदी एकसारखाच कसा काय?
दोघेही : कारण आमच्या घरी एकच गाय आहे. आम्ही त्याच गाईवर लिहिलाय.

एका पैलवानाने बन्याच्या थोबाडीत ठेवून दिली.
बन्या : (रडवेला होत) ओ... मला का मारलंत?
पैलवान : मला तुझा खूप राग आला, म्हणून मारलं... बोल काय म्हणायचंय तुला?
बन्या : क..क.. काही नाही, मग ठीक आहे. मला वाटलं मस्करी केली... आपल्याला मस्करी केलेली अजिबात आवडत नाही.

शिक्षक : बंड्या सुट्टीत गावी गेला होतास ना, मग सांग गावाला काय काय पाहिलंस?
बंड्या : गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्या...
शिक्षक : बरं, आता गाय आणि गवळी यांच्याविषयी माहिती सांग.
बंड्या : गाय जेव्हा दूध देते तेव्हा शुद्धच दूध देते आणि गवळी जेव्हा दूध देतो तेव्हा पाणी मिसळून देतो.

पाहुणे : काय बंड्या, पुढे काय करायचे ठरवलं आहे?
बंड्या : काही नाही काका, तुम्ही गेलात की बाबांनी आणलेला आईसक्रीम पॅक आम्ही सगळे खाणार, बस्स!







डोंबारी : या माझ्या माय बापांनो, आता मी तुमच्या समोर कोळसा, काचा, खिळे खाऊन दाखवणार आहे. त्यानंतर आख्खी तलवार गिळून दाखवणार आहे. मायबाप हो, कृपया रुपया दोन रुपया ताटात टाका... म्हणजे मला दोन भाकरी खाता येतील.
हौसाकाकू : आरं बाबा, एवढं सगळं खाल्ल्यावर भाकरीसाठी तुझ्या पोटात जागा तरी राहील का?




कॉलेजात जाऊ लागलेली मंगी तिच्या बाबांना म्हणते...
मंगी : बाबा आता मी तुम्हाला बाबा नाय म्हणणार..
बाबा : मग काय पप्पा म्हणणार?
मंगी : नाय... मी तुम्हाला डॅडी म्हणणार.
बाबा : का रं माझ्या बछड्या?
मंगी : मग माझी लिपस्टीक विस्कटणार नाय.



बाळू काकांशी सतत भांडणाऱ्या लीलाकाकू हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होत्या.
डॉक्टर : बाळूकाका, काकूंना रक्त द्यावं लागेल.. हो पण आश्चर्यच आहे, तुमचा आणि काकूंचा रक्त गट एकच निघाला.
बाळूकाका : अहो त्यात आश्चर्य कसलं?... गेली वीस वर्षे माझंच रक्त पितेय ना ती!



मंत्री : (सेक्रेटरीला) काय रे मूर्खा, भाषण एवढं लांबलचक लिहायची काय गरज होती? चार पानं वाचून माझा घसा कोरडा पडला ना!
सेक्रेटरी : साहेब, भाषण तर मी एकच पान लिहिलं होतं, तुम्ही त्याच्या चार झेरॉक्स काढून घेऊन गेलात.



कथा

# चूक उमगली

खूप खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका छोट्याशा गावात रामराव नावाचा एक शेतकरी राहत होता. त्याला दोन मुलं होती. मोठा सदाशिव आणि धाकटा महादेव. रामरावांनी काबाडकष्ट करुन मुलांना वाढवले, शिक्षण दिले.

त्यांच्या दोन मुलांपैकी मोठा सदाशिव हा अतिशय आळशी होता. धाकटा महादेव मात्र आज्ञाधारक व प्रामाणिक होता. तो वडिलांच्या कामात हातभार लावत असे. सदाशिव मात्र गावभर भटकत राही. रामरावांनी त्याला अनेक वेळा समजावून सांगितलेय पण काही फायदा झाला नाही. शेवटी मृत्यूसमयी रामरावांनी दोघांनाही जवळ बोलावले आणि सांगितले, “बाळांनो, माझ्याकडे तुम्हाला द्यायला काही नाहीये. फक्त एक शेत आहे, एक गाय आहे आणि शेतात एक आंब्याचं झाड आहे. तुम्ही आपसामध्ये समजूतदारपणे वाटून घ्या.” महादेव

म्हणाला, “हो बाबा! तुम्ही काही काळजी करु नका.”

रामरावांच्या मृत्यूनंतर मोठ्या भावाने म्हणजे सदाशिवने महादेवला सांगितले, “आपण आता वाटणी करुन घेऊया. शेतामध्ये जे पीक येईल त्यात वरचा भाग माझा आणि खालचा भाग तुझा. तसेच गाईचा पुढचा भाग तुझा आणि मागचा भाग माझा. शेतामध्ये जे आंब्याचे झाड आहे त्यात वरचा भाग माझा आणि खालचा भाग तुझा.” महादेव भोळा असल्याने त्याने या वाटणीला लगेच मंजुरी दिली.

पावसाळा सुरु झाला. सदाशिवने शेतात भात पेरला. भाताचे चांगले पीक आले. वरचा भाग म्हणजे भाताचे ओंब्या सदाशिवने घेतल्या आणि खाली असलेला कडबा महादेवला दिला. शेतात आंब्याचे झाड होते वरचा भाग म्हणजे झाडाला लागलेले आंबे सदाशिव घेतले. गाय दूध देऊ लागली गाईला चारा घालण्याचं, पाणी पाजण्याचं काम महादेव करी आणि मागचा भाग सदाशिवचा असल्याने सदाशिव मात्र तिचे दूध काढून घेई.

ही गोष्ट महादेवला खटकत होती, पण तो बिचारा शांत राहिला. त्याला आपल्या मोठ्या भावाचा कावा लक्षात आला. त्याने त्याला प्रेमाने समजावून सांगण्याचा प्रयत्न केला; परंतु सदाशिवने काही ऐकले नाही.

पुढच्या वर्षी महादेवने शेतामध्ये भुईमूग पेरला. भुईमुगाच्या सगळ्या शेंगा त्याने घेतल्या आणि सदाशिवला वरचा चारा दिला. त्यानंतर जेव्हा सदाशिव दूध काढायला जाई, तेव्हा महादेव गायीच्या तोंडावर फटके मारत असे. त्यामुळे गाय दूध देण्याऐवजी लाथा मारु लागली. परंतु सदाशिव काही बोलू शकत नव्हता; कारण पुढचा भाग महादेवचा होता.

उन्हाळ्यात आंब्याच्या झाडाला मोहोर आला. आता भरपूर आंबे लागतील या विचाराने सदाशिव खूष होता. महादेवने आंब्याच्या मुळाशी कुऱ्हाडीने घाव घालायला सुरुवात केली. तेव्हा सदाशिव म्हणाला, “महादेवा! आता पुरे झालं, मी तुझ्याशी दुष्टपणाने वागलो. मला माझ्या कर्माची शिक्षा मिळाली. मला माझी चूक उमगली.आता यापुढे जे पीक येईल किंवा झाडाला जेवढे आंबे येतील ते आपण निम्मे–निम्मे वाटून घ्यायचे. गाईचे दूध देखील निम्मे–निम्मे वाटून घ्यायचे.”

सदाशिवला आता उपरती प्राप्त झाली होती. महादेव म्हणाला, “दादा, मला क्षमा कर! मी तुझे डोळे उघडण्यासाठी मुद्दाम असे वागलो; परंतु यापुढे आपण खूप मेहनत करायची आणि जे उत्पन्न येईल अर्धे अर्धे वाटून घेऊ. अडीअडचणीला आपणच एकमेकाला आहोत. मग उगाचच बाहेरच्या लोकांना हस्तक्षेप करायला वाव का द्यायचा?”

सदाशिवला त्याचे म्हणणे पटले आणि दोघंही भाऊ शेवटपर्यंत गुण्यागोविंदाने नांदू लागले.

❖❖❖



स्वामी विवेकानंदांच्या जीवनातील प्रेरक प्रसंग

# ध्येय साध्य होईपर्यंत थांबू नका

स्वामी विवेकानंद देश–विदेशात सनातन धर्माचा प्रचार प्रसार करत फिरत होते. त्यांना भेटायला अनेक जण येत. प्रत्येकाच्या प्रश्नांची समर्थक उत्तरं देऊन ते सर्वांना संतुष्ट करीत. भेटायला येणाऱ्यांमध्ये तरुण, वृद्ध, स्त्री, पुरुष सारेच असत.

एकदा एक तरुण त्यांच्याकडे आला आणि म्हणाला, स्वामीजी! मी जे कार्य हाती घेतो ते पूर्ण होत नाही. खूप अडचणी येतात. मग ते सोडून मी दुसरं काम हाती घेतो, पण तेही नीट होत नाही. आता मी काय करू ते समजत नाही. तुम्हीच मला मार्गदर्शन करा. स्वामीजी म्हणाले, तुझ्या प्रश्नाचं उत्तर देण्यापूर्वी तू माझं एक काम कर, त्यांनी दाराबाहेर बांधलेल्या कुत्र्याचा पट्टा त्या तरुणाच्या हाती देत म्हटले, या कुत्र्याला समोरच्या नाक्यापर्यंत फिरवून आण. तो तरुण कुत्र्याला घेऊन नाक्यापर्यंत गेला. थोड्या वेळाने दोघेही धापा टाकत परत आले. स्वामीजींनी विचारले, तुला एवढी धाप का

(पान ३६ वर)

# जमिनीवर बसून जेवणाचे १० फायदे

१) पचन सुधारते. जमिनीवर मांडी घालून बसल्याने अर्धपद्मासनाची स्थिती निर्माण होते. तसेच जमिनीवर ताट असल्याने जेवणाचा घास घेण्यासाठी वाकावे लागते.
या सतत होणाऱ्या शारीरिकहालचालीमुळे पोटाजवळील स्नायूंना चालना मिळते व पचनाची क्रियादेखील सुधारते.

२) वजन घटवण्यास मदत होते. जमिनीवर बसून जेवल्याने, वजन कमी होण्यासही मदत होते. वजन वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे प्रमाणापेक्षा अधिक खाणे. जमिनीवर बसून जेवताना 'वेगस नर्व्ह' (पोटाकडून मेंदूला संकेत देणारी) भूक व जेवणाचे प्रमाण योग्यप्रकारे राखू शकते. टेबलापेक्षा जमिनीवर बसून जेवल्याने, जेवणाचा वेग मंदावतो व पोट आणि मेंदूतील समन्वयता सुधारते. परिणामी अतिप्रमाणात खाण्याची वृत्ती कमी होते व वजनही काबूत राहते.

३) लवचिकता वाढवते. पद्मासनात बसल्याने, पाठीचे, कमरेतील तसेच पोटाजवळील स्नायूंवर ताण आल्याने पचनसंस्थेचा मार्ग सुधारतो. अशा स्थितीत बसल्याने पोटावर ताण येण्याऐवजी जेवण पचण्यास व ग्रहण करण्यास मदतच होते. परिणामी पोटाजवळील स्नायूंवर ताण आल्याने शरीर लवचिक व आरोग्यदायी बनण्यास मदत होते.

४) मन शांत होते व खाण्यावर लक्ष केंद्रित होते. जमिनीवर बसून जेवल्याने मेंदू शांत होतो व तुमचे सारे लक्ष जेवणाकडेच राहते. मनाची अस्थिरता कमी झाल्याने, जेवणातून मिळणारी पोषणतत्त्वे शरीर अधिक उत्तम प्रकारे ग्रहण करण्यास समर्थ होते.

५) कुटुंबातील सदस्यांशी जवळीक वाढते. दिवसातील किमान एका जेवणाचा आपल्या कुटुंबासोबत जरुर आनंद घ्यावा. दिवसभरातील शीण व ताणतणाव हलका होतो. तसेच एकमेकांशी बोलल्याने, काही समस्यांतून मार्ग शोधण्यास मदत होते व नकळत कुटुंबातील सदस्यांशी जवळीक वाढते.

६) शरीराची स्थिती (पॉश्चर) सुधारते. शरीराची स्थिती उत्तम राखणे हे निरोगी आरोग्याचे गमक आहे. शरीरातील काही स्नायू व सांध्यांवरील



अतिरिक्त ताण कमी करुन थकवा कमी होण्यासदेखील मदत होते. जमिनीवर बसून जेवताना पाठीचा कणा ताठ राहतो व पोट, खांदा व पाठीच्या स्नायूंची योग्य प्रमाणात हालचाल होते.

७) दीर्घायुषी बनवते ही अतिशयोक्ती नाही. जमिनीवर बसून जेवल्याने आयुष्य वाढते. जमिनीवर मांडी घालून बसलेली व्यक्ती जर कशाचाही आधार न घेता उठली तर त्यांचे आयुष्यमान अधिक आहे, असे समजावे

८) गुडघे व कमरेतील सांधे मजबूत होतात. Yoga for Healing या पुस्तकाचे लेखक पी.एस.वेंकटेशवरा यांच्यामते, पद्मासनामुळे शरीर निरोगी राहण्यास मदत होते. पचन संस्थेसोबतच सांधेदुखीचा त्रास होत नाही. गुडघा, घोटा व कंबरेतील सांधे लवचिक झाल्याने अनेक विकार दूर राहण्यास मदत होते. जमिनीवर बसल्याने स्नायूंबरोबर सांध्यांची लवचिकतादेखील वाढते.

९) चंचलता कमी होते, मांडी घालून किंवा पद्मासनात बसल्याने नसांमधील थकवा कमी होतो. म्हणूनच जेवताना जमिनीवर मांडी घलून बसण्याचा सल्ला दिला जातो. यामुळे मन, मेंदू व परिणामी शरीरातील त्रास कमी होतात.

१०) हृदयाला होणारा रक्त पुरवठा सुधारतो. काही वेळेस जेवल्यानंतरही तुम्हाला गरम होते किंवा घाम आल्याचे आठवते का? हो हे शक्य आहे. कारण अन्नाचे पचन होण्यासाठी शरीराला उर्जेची अधिक गरज असते. खुर्चीवर बसण्याऐवजी जमिनीवर बसून जेवल्याने शरीरातील रक्त प्रवाह सुधारतो. तसेच पचनही सुधारते.

❖❖❖

## ध्येय साध्य होईपर्यंत थांबू नका

(पान ३४ वरुन)

लागली आहे? येताना तर तू अगदी शांतपणे आला होतास; परंतु आता एवढी दमछाक कशी काय झाली? तो तरुण स्वतःला सावरत म्हणाला, स्वामीजी! हा कुत्रा सरळ चालतच नव्हता, सारखा इकडे तिकडे पळत होता. त्यामुळे मलाही त्याच्या मागे मागे पळावे लागले म्हणून मला धाप लागली. स्वामीजी म्हणाले, यातच तुझ्या प्रश्नाचं उत्तरही आहे. जेव्हा तू एखादं कार्य हाती घेतोस, तेव्हा ते एकाग्र मनाने आणि सरळ मार्गाने कर. अडथळे, समस्या या येणारच. त्यामुळे सैरभैर होऊ नकोस. त्या कार्यात स्वतःला शंभर टक्के झोकून घे. तुझं ध्येय साध्य होईपर्यंत थांबू नकोस.

अशा प्रकारे त्यांनी अनेक तरुणांना आपल्या ध्येयाचा मार्ग दाखवताना हाच उपदेश केला, की—ध्येय साध्य होईपर्यंत थांबू नका.

संग्राहक : सुकदेव पाटील



हसती दुनिया (मराठी) मासिकाचे मालक हक्क व इतर तपशीलसंबंधी
(केंद्र सरकारच्या फॉर्म ४ नियम ८ अन्वये)

**❖ प्रकाशन स्थळ ❖**

संत निरंकारी सत्संग भवन, ५०, मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -१४

❖

**प्रसिध्दी काळ**

दरमहा

❖

**मुद्रकाचे नाव, पत्ता व राष्ट्रीयत्व :**

श्री. चंद्रकांत अनंत जाधव
संत निरंकारी सत्संग भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -१४
भारतीय

❖

**प्रकाशकाचे नाव, पत्ता व राष्ट्रीयत्व :**

श्री. चंद्रकांत अनंत जाधव
संत निरंकारी सत्संग भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -१४
भारतीय

❖

**संपादकाचे नाव, पत्ता व राष्ट्रीयत्व :**

श्री. राजेंद्र बापू थोरात
संत निरंकारी सत्संग भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -१४
भारतीय

❖

**मालकाचे नाव, पत्ता व राष्ट्रीयत्व :**

संत निरंकारी मंडळ, माहूल रोड, चेंबूर कॅम्प, मुंबई -७४.
भारतीय

मी **श्री. चंद्रकांत अनंत जाधव** प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

ता. ०१-०४-२०२३

चंद्रकांत अ. जाधव
प्रकाशक व मुद्रक



# किट्टी

चित्रांकन व लेखन :
अजय कालडा




आई, आज संध्याकाळी मी, बंटी आणि चानी चिंटूच्या घरी अभ्यासाला जाणार आहोत.
बरं, जा! पण अभ्यासच करा हं. नाहीतर खोड्या करत बसाल आणि अभ्यास तसाच राहील.
चिंटू, आम्ही आलो!


किट्टी, चल आपण अभ्यास करुया. कुणीही कुणाची खोडी काढायची नाही.
ए, मी बंटीची वही लपवतो, सांगू नकोस हं कुणाला! मज्जा येईल.
अरे बंटी, तू होमवर्कची वही नाही आणलीस ?
अरे, मी तर वही घेऊन आलो होतो, कुठं गेली बरं ?


अरे, शोधा, कुठं गेली वही ?
किट्टी ऽऽ, बाळ किती उशिर झाला! चल घरी लवकर.
अरे देवा! बंटीची खोडी काढण्यात मी माझा होमवर्कच विसरले.
आता मॅडमच्या हातचा प्रसाद खावा लागेल. शी! आपण उगाचच खोड्या काढण्यात वेळ घालवला. यापुढे असं कधीच वागायचं नाही!

# सूफी संत बुल्लेशाह

पंजाबमध्ये बुल्लेशाह नावाचे एक प्रसिद्ध सुफी संत होऊन गेले. त्यांना अनेक सिद्धी प्राप्त होत्या; परंतु आत्मज्ञान नसल्याने त्यांना सारं काही असार वाटत होते. गुरूंचा शोध घेत घेत ते लाहोरला पोचले. तेथे इनायतशाहजी नावाचे उच्च कोटीचे सत्पुरुष होते. ते शेतीवाडी आणि बागकाम करत असत.



बुल्लेशाहजी त्यांच्या बागेत गेले. इनायतशाहजी बागेतील रोपं उपटून दुसरीकडे लावत होते. बुल्लेशाहजींनी त्यांच्या चरणी लोटांगण घालत प्रभुप्राप्तीची अपेक्षा व्यक्त केली. त्यावर गुरु इनायतशाहजी म्हणाले, उभा राहा आणि माझ्याकडे पहा. गुरुजी प्रेमळ दृष्टी टाकत म्हणाले, बुल्लया, रब दी की पाणा, एदरो पुटणा ते ओदरो लाना, परमेश्वराला काय प्राप्त करायचं? जसं हे रोप मी इथून उपटून दुसरीकडे लावतो इतकं सोपं आहे हे! बुल्लेशाहजींनी गुरुदेवांनी सांगितलेल्या मार्गावर चालत आपलं जीवन सुखमय बनवलं; परंतु एक अशी घटना घडली, की गुरुदेव त्यांच्यावर नाराज झाले. त्याचं कारण असं होतं, एकदा बुल्लेशाहजींनी आपल्या गुरुदेवांना एका नातेवाईकाच्या लग्नाचं आमंत्रण पाठवलं होतं. इनायतशाहजींनी त्या लग्नासाठी आपला एक शिष्य पाठवला. तो शिष्य कनिष्ठ जातीचा असल्याने बुल्लेशाहजी आणि त्याच्या घरच्यांनी त्याच्याकडे नीट लक्ष दिलं नाही. ही गोष्ट इनायतशाहजींना कळल्यावर ते नाराज झाले. त्यांनी बुल्लेशाहजींकडे पाठ फिरवली.त्यांच्यावर संकट कोसळले. पाण्यावाचून मासा तळमळावा तशी त्यांची अवस्था झाली. त्यांच्या गुरुला नृत्य–गायनाची आवड होती. काही दिवस गेल्यानंतर त्यांनी आपल्या गुरूला प्रसन्न करण्यासाठी संगीत आणि नृत्य शिकण्याचा प्रयत्न केला. त्यात ते प्रवीण झाले. एकदा एका उत्सवानिमित्त गुरुदेव तिथे आले असताना नृत्य संगीत कार्यक्रम सुरू झाला. त्यावेळी बुल्लेशाहजी वेश बदलून नाचू–गाऊ लागले. एकापाठोपाठ विरहगीत गात राहिले. बाकीचे नाचणारे सगळे थकून गेले; परंतु बुल्लेशाहजी मात्र नाचतच होते. त्यांची आर्त विनवणी ऐकून गुरुदेव म्हणाले, अरे! तू बुल्ला आहेस ना? त्यावर ते म्हणाले, गुरुदेव! मी भुल्ला आहे, वाट चुकलेला आहे. गुरुदेवांनी त्यांना हृदयाशी कवटाळले. असे होते गुरुभक्त बुल्लेशाहजी.

❖❖❖

कविता

# एक परिवार

- सुरेश तिर्लोटकर

अवघाची संसार
आहे एक परिवार
हे कुटुंब या एकाचे
विश्वाचा जो आधार ।।धृ।।

जशी आपुली मायपिता
असती बंधू भगिनी
यावी समज जगाला
तेही स्वकीय म्हणोनी
प्रेम प्रीतीच्या शब्दांनी
सर्वांचा करुया सत्कार ।।१।।

पळुन जाईल वैर घृणा
जागेल अंतरी बंधु भाव
जाईल दृष्टीक्षेप तिथे
होईल प्रेमाचा वर्षाव
संपून जाईल परपीडा
येईल उद्या परोपकार ।।२।।

परिवर्तित होईल समाज
आत्मज्ञानाने कळेल जीवनाचे राज
शोभून दिसेल सकळांना
दैवी गुणांचा साज
होईल सारा मानव
वसुधैव कुटुंब परिवार ।।३।।





कथा

# सत्कर्मासाठी एक पाऊल पुढे टाका

एक घनदाट जंगल होतं. त्या जंगलात खूप जुनी झाडं होती. फळझाडं होती. फुलझाडं होती. मुबलक पाणी आणि फळफळावळ असल्यामुळे अनेक प्राणी, पक्षी, फुलपाखरं तेथे आनंदाने राहत होते.

एके दिवशी या जंगलाला कोणी दुष्टाने आग लावली. जंगलात वणवा पेटला. वणव्याचं हे भयानक रूप पाहून प्राणी–पक्षी घाबरून गेले. प्रत्येक जण जीव वाचवण्यासाठी जंगलाबाहेर जाऊ लागले. त्या जंगलात एक खूप जुनं वडाचं झाड होतं. त्या झाडावर चिमणा–चिमणी घरटे बांधून राहत होते. ते लहानपणापासून त्याच जंगलात वाढले होते. बागडले होते. ते जंगल सोडून जाण्याची कल्पना त्यांना सहन होत नव्हती. खूप विचार केल्यावर दोघांनी आपल्या घरट्यातील पिल्लं सुरक्षित ठिकाणी नेऊन ठेवली आणि दोघंही थेट नदीच्या दिशेने झेपावली. नदीवर जाऊन

(पान ४६ वर)



# जे होतं ते चांगल्यासाठी

मित्रांनो, तुम्हाला लॉरेल, हार्डी, चार्ली चॅप्लिन ही नावं ठाऊक आहेत का? कदाचित नसतीलही. कारण हे तिघेही जुन्या काळातील विनोदवीर आहेत. ज्यावेळी ब्लॅक अँड व्हाईट टीव्हीचा जमाना होता तेव्हा यांच्या मालिकांनी प्रेक्षकांना अक्षरशः वेड लावलं होतं. प्रेक्षकांना खळखळून हसायला लावणाऱ्या या कलाकारांच्या जीवनातील हा एक प्रसंग आहे.

साधारणतः १९१० चा कालखंड आहे. या काळात लॉरेल आणि चार्ली हे दोघे कलाकार अमेरिकेतील एकाच कंपनीत काम करत होते. या दोघांनी अनेक स्टेज शो केले. लोकांना खळखळून हसवलं. शो संपल्यानंतर चार्ली त्याच्या मायदेशी म्हणजे इंग्लंडला परत गेला नाही. कारण त्याला अमेरिकेत चित्रपटाच्या अनेक ऑफर आल्या. तो चित्रपट करू लागला; परंतु लॉरेलला मात्र एकही काम मिळालं नाही. चित्रपटात काम करताना स्वतःची चित्रपट निर्मितीची कंपनी उघडायची असं चार्लीने ठरवलं आणि त्यात आपला मित्र लॉरेल

यालाही सहभागी करून घ्यायचं ठरलं. लॉरेलला ही गोष्ट ऐकून अतिशय आनंद झाला; परंतु बराच कालावधी गेला तरी चार्लीने लॉरेलला काही बोलावलं नाही. त्यामुळे लॉरेल खूपच उदास झाला. तरीही त्याने चार्लीला दोष न देता एवढंच म्हटलं, की देवाने एक दरवाजा बंद केला तरी दुसरा दरवाजा माझ्यासाठी नक्कीच उघडला असेल. देव जे करतो ते चांगल्यासाठीच असतं. असे म्हणून तो पुन्हा प्रयत्नाला लागला. कालांतराने लॉरेल आणि हार्डी या दोघांनी कर्ज काढून स्वतःची कंपनी स्थापन केली. अतिशय मेहनत घेऊन जगभर आपले कार्यक्रम केले. ही जोडी पुढे (जाड्या आणि रड्या) खूपच प्रसिद्ध झाली.

या घटनेवरून एक गोष्ट मात्र नक्की आहे, चार्लीने आपला मित्र लॉरेल याला कंपनीत कामाची संधी दिली नाही ते एका दृष्टीने चांगलंच झालं. अन्यथा तो स्वतःच्या पायावर उभा राहिला नसता व हार्डीसारख्या मित्राला घेऊन त्याने उत्कृष्ट विनोदी कार्यक्रम सादर केले नसते. तो केवळ चार्लीच्या अधिपत्याखालीच काम करत राहिला असता. म्हणूनच लॉरेल म्हणतो त्याप्रमाणे ईश्वर जे करतो ते चांगलं करतो. अशी विचारसरणी ठेवून निराश न होता जे आपल्या कार्याला लागतात तेच पुढे यशस्वी होतात. हे लॉरेलच्या जीवनातून दिसून येतं.

म्हणून कधीही निराश हताश न होता, कोणालाही दोष न देता आपलं कर्म चालू ठेवावं. कारण कर्म करणाऱ्यालाच ईश्वर सहाय्य करत असतो.

एप्रिल २०१९ मध्ये लॉरेल आणि हार्डी कॉमिक रूपामध्ये अवतरले आहेत.

❖❖❖

## सत्कर्मासाठी एक पाऊल पुढे टाका

(पान ४४ वरुन)

त्यांनी चोचीत मावेल एवढं पाणी भरलं आणि पंखही भिजवले आणि पुन्हा वणव्याच्या दिशेने आली. वणव्यावर चोचीतील पाणी टाकत राहिले. पंख फडफडून आग भिजवण्याचा प्रयत्न करु लागले. अशा कितीतरी फेऱ्या त्यांनी मारल्या. थेंब थेंब पाणी वणव्यावर टाकत गेले; पण एवढ्या पाण्याने काही होणार नाही याची त्यांना कल्पना आली. त्यांनी ईश्वराकडे प्रार्थना केली आणि आपला प्रयत्न चालूच ठेवला. आता जीव गेला तरी बेहत्तर आपण आपलं हे जंगल वाचवण्याची पराकाष्ठा करायची. यामध्ये मृत्यू आला तरी चालेल. समाधान हेच असेल, की आपण आग लावणाऱ्यांमध्ये नाही तर विझवणाऱ्यांमध्ये होतो ही देवाच्या दरबारी नोंद होईल. त्यांचे हे प्रयत्न पाहून निसर्गालाही दया आली. थोड्याच वेळात आकाशात काळे काळे ढग जमा होऊ लागले आणि मुसळधार पाऊस सुरू झाला. क्षणार्धात वणवा विझला. चिमणीचं जंगल वाचलं. सारे प्राणी पक्षी पुन्हा आपापल्या निवासस्थानी परतले आणि आनंदाने राहू लागले.

म्हणूनच म्हटलंय, सत्कर्मासाठी एक पाऊल पुढे टाकलं तर परमेश्वर देखील आपल्या पाठीशी मदतीसाठी उभा राहतो.

❖❖❖

# सामान्य ज्ञान



१)सौरमंडळातील सर्वात लहान ग्रह कोणता?
अ) मंगळ ब) शनि क) बुध ड) नेपच्यून

२)सलग दोन वेळा राष्ट्रपती पद भूषवणारे भारतीय राष्ट्रपती कोण?
अ)ए. पी. जे. अब्दुल कलाम आझाद ब) डॉ. राजेंद्र प्रसाद
क) रामनाथ कोविंद ड) ग्यानी झैल सिंग

३) पृथ्वीवर सर्वात जास्त कोणता धातू सापडतो?
अ) सोने ब) लोखंड क) तांबे ड) ॲल्युमिनियम

४) ‘हवामहल’ ही सुंदर वास्तू कुठे आहे?
अ) कोलकाता ब) हैद्राबाद क) जयपूर ड) पुणे

५) ‘एडीस’ नावाच्या डासाची मादी चावल्यावर कोणता आजार होतो?
अ) हिवताप ब) डेंग्यू क) टायफॉइड ड) फायलेरिया

६) २३ एप्रिल रोजी कोणता दिवस साजरा केला जातो?
अ) हास्य दिन ब) वाचन दिन क) युवा दिन ड) पुस्तक दिन

७) चंद्रावर सर्वात प्रथम कोणता प्राणी गेला होता?
अ) कुत्रा ब) मांजर क) उंदीर ड) बेडूक

8) सॅमसंग ही कंपनी कोणत्या देशातील आहे?
अ) चीन ब) साऊथ कोरिया क) जपान ड) जर्मनी

9) २००० हजार रुपयाच्या नोटेवर कसलं चित्र असतं?
अ) मंगळयान ब) लाल किल्ला क) वेरुळच्या लेणी ड) कोणार्क रथ

१०) परमपिता परमात्म्याची ओळख सर्वांना झाली तर काय घडेल?
अ) सगळे श्रीमंत होतील ब)मानवा मानवात एकता स्थापन होईल
क) सगळे भक्त बनतील ड) सगळे अमर होतील.

उत्तरे इतरत्र

# कॉमन कॉर्प

गोड्या पाण्यात जगात बहुतेक सर्वत्र आढळणारा हा मासा आहे. गोल्डफिश माशाशी त्याचे बरेच साम्य आढळते. हा मासा सायप्रिनिडी कुळातील आहे. आशिया आणि पूर्व युरोप ही त्याची मूळ स्थाने आहेत. जगातील काही भाग सोडला तर इतर ठिकाणच्या वातावरणात तो जगू शकतो. यांच्यातील एक जात ही मूळ चीन आणि जपान मधील आहे. या माशाची लांबी ५ फुटापर्यंत असून वजन ३७.३ कि. ग्रॅम इतके असते. याच्या अंगावर खवले असून डोळे मोठे असतात. याची आयुष्य मर्यादा ६५ वर्षापर्यंत असते. हा मासा कळपाने राहाणारा असून कमीत कमी पाच किंवा त्याहीपेक्षा जास्त अशा





कळपाने तो पाण्यात फिरत असतो. ३५ अंश ते ८५ अंश तापमानाच्या वातावरणात तो राहातो. कॉमन कॉर्प हा मासा बहुतेक करुन शाकाहारी आहे. पान वनस्पती, फंगस हे त्याचे खाद्य आहे. पण यातील काही जाती किडे आणि मृदूकाय प्राणी सुद्धा खातात. या माशांचे वैशिष्ट्य म्हणजे यांची मादी एका वेळेला तीन लाख अंडी घालते. हा मासा १८३१ मध्ये अमेरिकेतून सर्व जगभर आणला गेला. या माशाच्या विक्रीचा व्यवहार हा काही कोटी रुपयांचा आहे. कारण फूडफिश म्हणून याचा उपयोग सर्व ठिकाणी होतो.

-संग्राहक : स्वप्निल वि.न्हाटवळ

# नेत्रसुखद रंगाचं बॅरोनेट

बॅरोनेट हे आपल्याकडे पावसाळ्यात आणि त्यानंतरच्या काळात दिसणारं फुलपाखरु. गर्द केशरी रंग ही त्याची खासियत आहे. या फुलपाखराचा आकार मध्यम असून, त्याच्या पंखांचा विस्तार हा साधारणतः ६० ते ७० मिलीमीटर एवढा असतो. याचे पुढच्या बाजूचे पंख गडद भगव्या रंगाचे असतात आणि त्यावर काळ्या रंगाची, वळणदार नक्षी असते. याच्या पंखाची खालची बाजूदेखील केशरी रंगाचीच असते; पण हा रंग काहीसा फिकट असतो. या पंखांवर अतिशय बारीक अशा काळ्या व लाल ठिपक्यांची नक्षी असते. तसंच या भागात पांढऱ्या रंगाचे दोन मोठे चट्टेसुध्दा असतात. या पंखांवर पांढऱ्या - निळसर रंगाची झळाळी असते, ज्यामुळे उन्हात उडताना हे पंख चमकदार दिसतात. या फुलपाखराच्या स्पृशा काळ्या रंगाच्या असतात व त्याची टोकं गडद पिवळ्या-केशरी रंगाची असतात. या प्रजातीतील





नर व मादी दोघंही एकसारखेच दिसतात. मात्र, यांच्या रंगांमध्ये थोडासा फरक दिसून येतो.

पावसाळ्याच्या महिन्यांत जंगलातील पायवाटांवर हे फुलपाखरु हमखास आढळतं. हिरव्या झाडीतील ही केशरी रंगाची उधळण आपलं लक्ष वेधून घेते. हे फुलपाखरु चंचल असल्याने याचं छायाचित्रण करणं वा त्याच्या जवळ जाणं जरा कठीणच असतं. याला स्पर्श करण्याचा प्रयत्न केल्यास ते लगेच थोडंसं पुढे जाऊन बसतं. सकाळच्या कोवळ्या उन्हात ही फुलपाखरं जास्त उडताना दिसतात आणि एखाद्या फांदीच्या टोकावर बसून आजूबाजूला टेहाळणी करताना आढळतात. तसचं ही फुलपाखरं इतर फुलपाखरांना त्रास देत त्यांच्या पाठीमागे जलद उडत जातात व त्यांचा पाठलाग करुन त्यांना पळवून लावतात. आपल्या क्षेत्राचं रक्षण करण्यात ही फुलपाखरं पटाईत असतात.

या फुलपाखरांना चिखलपान अतिशय प्रिय असल्याने उन्हाळ्याच्या काळात कोरडे ओढे, नाले यांच्या आसपास ही मोठ्या संख्येने आढळतात. या फुलपाखरांचा केशरी रंगाचा समूह पाहणं अतिशय नेत्रसुखद असतं.

-संग्राहक : अंकित चं. जाधव

# रंग भरा





## सामान्यज्ञान उत्तरे

१. क
२. ब
३. ड
४. क
५. ब
६. ड
७. अ
८. ब
९. अ
१०. ब

## शब्द कोडे २९७

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ ए | | | २ व | डो | ३ द | रा |
| ४ को | ल्हा | पू | र | | धि | |
| ण | | | दा | | ५ ची | ६ न |
| ७ ती | न | ८ शे | न | ९ ऊ | | ज |
| स | | वा | | १० स | ११ ता | र |
| | १२ ह | ळ | १३ द | | प | |
| | ज | | १४ म | ध | मा | शी |
| १५ शि | र | ढो | ण | | पी | |

।। तू ही निरंकार ।।

पूर्ण सदगुरु निजभक्तांची सारी संकटे दूर करी।
पूर्ण सदगुरु निजभक्तांवर कृपा दृष्टी उपकार करी।
पूर्ण सदगुरु भक्त जनांची पापे सारी नष्ट करी।

पूर्ण सदगुरु निजभक्तांची सर्व सुखाने झोळी भरी।
पूर्ण सदगुरु निजभक्तांवर आले संकट दूर करी।
पूर्ण सदगुरु भक्त जनांचे दुःख तापही दूर करी।



शंकरराव जाधव
संयोजक, वाई तालुका

महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही... एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

**THE COMPLETE FAMILY SHOWROOM**

**मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते**

ऐ मन मेरे सुमिरण कर ले सुमिरण से सुख आयेगा। घेरेंगे न संकट तुझ को भवसागर तर जायेगा।
दम दम पल छिन नाम का जो जन करता अमृत पान है। ऐसे जन को जग में सन्तो मिलता जीवन दान है।

गुरू का जो यशगान करेगा यश दुनिया में पायेगा।
उसकी भी महिमा होगी जो गुरू की महिमा गायेगा।
गुरू की जैं जैं जो करता है उसकी होती जैं जैं कार।
गुरू की पूजा जो करता है उसको पूजे कुल संसार।

९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2022-2024
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2022-24
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

